महाराष्ट्र पोलीस
यवतमाळ पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट, दिनांक :-१०/१२/२०२२

---

### ऑनलाईन फसवणुकीतील ९९ हजार रुपये परत (refund)
### सायबर सेल, यवतमाळ यांची कामगिरी

दिनांक-२३/११/२०२२ रोजी भाग्योदय सोसायटी यवतमाळ येथे राहणा-या एका महिलेला मो.क्रं. ७००१४५४६५४ यावरुन ईलेक्ट्रीक बिलचे पेमेंट बाकी आहे या करणाने फसवणुकीचा कॉल आला. कॉलवरील व्यक्तीने संभाषण करताना बोलण्याचे ओघात तक्रारदार महिलेच्या मोबाईलवर एक लिंक पाठवुन त्यावर क्लीक करायला सांगीतले. त्या लिंकवर क्लीक करताच महिलेच्या मोबाईलचा एक्सेस अज्ञात आरोपीकडे गेल्याने अज्ञात आरोपीने महिलेच्या बँके खात्यामधुन १ लाख ५८ हजार रुपये ऑनलाईन वळते करुन फसवणुक केली. तक्रारदार यांची फसवणुक झाल्याचे त्याचे लक्षात येताच त्यांनी लागलीच सायबर सेल, यवतमाळ येथे धाव घेतली, सायबर येथील अधिकारी व अमंलदार यांनी तात्काळ तक्रारदार यांचेकडील माहिती घेवुन बँक स्टेटमेंटचा अभ्यास व तांत्रीक तपास करुन संबधित नोडल ऑफिसर यांना संपर्क केला असता तक्रारदार महिलेचे ९९ हजार रुपये परत आणण्यामध्ये यश आले आहे. सदर फसवणुकीबाबत पोस्टे अवधुतवाडी येथे अपराध क्रं.१२४९/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. सह कलम ६६ सि, ६६ डी आयटी एक्ट प्रमाणे गुन्हा नोदं करण्यात आला असुन तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि वागतकर, सपोनि विकास मुंढे, पोलीस शिपाई अजय निंबोळकर ब.नं.९८०, मपोशी रोशनी जोगळेकर सायबर सेल यवतमाळ यांनी पार पाडली.

याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्याला लॉटरी, जॉब ऑफर, ईलेक्ट्रीक बिल, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन लोन किंवा ५ जी अपडेट ईत्यादीबाबत मोबाईल नंबरवरुन कॉल आल्यास अशा प्रकारच्या कोणत्याही अनोळखी कॉलला प्रतिसाद देवु नका किंवा कोणत्याही लिंकवर खात्री झाल्याशिवाय क्लीक करु नये. त्याचप्रमाणे Google वर Costumer care contact number सर्च करताना खात्री केल्याशिवाय सर्च केलेल्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करु नका. दुर्दैवाने आपल्यासोबत सायबर क्राईमचा प्रकार घडल्यास तात्काळ सायबर सेल येथे संपर्क करावा. तसेच १९३० या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर जावुन सायबर क्राईमबाबत ऑनलाईन तक्रार नोंदविता येईल.

(प्रभारी अधिकारी)
सायबर सेल,यवतमाळ 10/12